नि.फौ.ख. क्रमांक.१२२/२०१८
सरकार विरुध्द स्वप्नील
निशाणी क्रमांक —७९.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१०</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव — शिवानंद लक्ष्मण बिरादार,
वय -४३ वर्षे, धंदा - शेती,
रा. सुल्लाळी, ता.जळकोट, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती काकडे</u>**

**०१.** दि.०४/०७/२०१८ आणि ०६/०७/२०१८ रोजी पोलिसांनी मला कोठेही बोलाविले नव्हते. आरोपीकडून माझेसमक्ष कोणताही मुद्देमाल जप्त केला नव्हता. आता मला दि.०४/०७/२०१८ रोजीचे दोन जप्ती पंचनामे दाखविले, त्यावर माझया सहया आहेत. त्यातील मजकुर मला माहिती नाही. सहीपुरते जप्ती पंचनाम्याना **<u>नि.क्र.८० व ८१</u>** देण्यात येते. दि.०६/०७/२०१८ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. सहीपुरता जप्ती पंचनाम्याना **<u>नि.क्र.८२</u>** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.०४/०७/२०१८ रोजी पोलिसांनी मला अहमदपूर पोलीस ठाण्यात बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी आरोपी स्वप्नील व दुसरे पंच हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने भगव्या रंगाचा शर्ट, दोन फुट दांडा कुऱ्हाड आणि वेळूची काठी माझेसमक्ष काढून दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, तसा जप्ती पंचनामा पोलिसांनी माझ्यासमक्ष केला, त्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६/०७/२०१८ पोलिसांनी मला अहमदपूर पोलीस ठाण्यात बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, स्नेहल संभाजी चारोळे यांचे ताब्यातील हाफ भायाचा शर्ट काढून दिला. हे म्हणणे खरे नाही की, तसा जप्ती पंचनामा पोलिसांनी माझ्यासमक्ष केला, त्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याच्या वेळी दुसरे पंच व्यंकटी गुडमे हे हजर होते. मी आरोपींना ओळखतो. मला लिहिता-वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, दैनंदीन व्यवहारात वाचल्यानंतर सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.बी.बी.क्षिरसागर यांच्यामार्फत सुरु</u>:-**

**०३.** उलटतपास नाकारला.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक -२१.०८.२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.